**इतिवृत्त-**

**मराठी अभ्यासमंडळ बैठक** -

हिंदी विद्या प्रचार समितीद्वारा संचालित रामनिरंजन झुनझुनवाला कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,(स्वायत्त) ,मराठी विषयाच्या अभ्यासमंडळाची २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील दुसरी बैठक ,शुक्रवार, दि.१० फेब्रुवारी २०२२ रोजी,दुपारी २.०० वाजता झूम मीट द्वारे आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीसाठी प्रस्तावित विषयांची कार्यसूची पुढीलप्रमाणे ठरवण्यात आली-

अ. अभ्यासमंडळाच्या आधीच्या बैठकीचे इतिवृत्त वाचून निश्चित करणे.

आ.पुढील शैक्षणिक वर्षात (२०२२-२३) द्वितीय वर्ष मराठीच्या अभ्यासपत्रिकांच्या संदर्भात अभ्यासक्रमाची निश्चिती करणे.

इ.पुढील शैक्षणिक वर्षात (२०२२-२३) द्वितीय वर्ष मराठीच्या विद्याशाखाविशिष्ट वैकल्पिक अभ्यासक्रमाची निश्चिती करणे.

ई.अध्यक्षांच्या सहमतीने ऐन वेळी उपस्थित होणाऱ्या मुद्द्यांची चर्चा करणे.

या बैठकीला पुढील सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. स्नेहा देऊस्कर
२. डॉ. नीलांबरी कुलकर्णी
३. डॉ.नीतिन आरेकर
४. डॉ. प्रिया जामकर
५. डॉ. वर्षा तोडमल
६. डॉ. अर्चना कुरतडकर
७. डॉ. भारती निरगुडकर
८. डॉ. प्रकाश परब
९. डॉ. प्रिया वैद्य

श्रीम.दीपाली चौधरी यांनी वैयक्तिक कारणासाठी आपली अनुपस्थिती सूचित केली होती.

मराठी अभ्यासमंडळाच्या अध्यक्षा,डॉ. स्नेहा देऊस्कर यांनी २०२१-२२या शैक्षणिक वर्षातील दुसऱ्या बैठकीस झूम मीट द्वारे उपस्थित सर्व सदस्यांचे स्वागत केले.

**१.**अध्यक्षांनी अभ्यासमंडळाच्या पहिल्या बैठकीचे इतिवृत्त सादर केले. सर्व सदस्यांनी त्यास मान्यता दर्शवून ते कायम केले.

**२.** पुढील शैक्षणिक वर्षात (२०२२-२३) द्वितीय वर्ष मराठीच्या अभ्यासपत्रिकांच्या संदर्भात अभ्यासक्रमाची निश्चिती करण्याबाबत अध्यक्षांनी पहिल्या बैठकीतील प्रस्तावातील पर्यायांमधून निवडलेल्या अभ्यासक्रमाची मांडणी केली.

१) **द्वितीय वर्ष कला शाखा,मराठी अभ्यासपत्रिका क्र.२** साठी **तृतीय सत्रात कादंबरी हा साहित्यप्रकार** निश्चित करण्यात आला.त्याचे स्वरूप पुढील प्रमाणे-

पेपर कोड- **RJAUMAR301 (तासिका- ४५. श्रेयांकने- ३)**

घटक-१- **कादंबरी या साहित्यप्रकाराचा सैद्धांतिक परिचय**

(तासिका-१५, श्रेयांकन-१)

घटक-२- **बनगरवाडी- व्यंकटेश माडगूळकर,मौज प्रकाशन.**

( तासिका-१५, श्रेयांकन-१)

घटक-३- **लॉग आउट- श्रुती आवटे ,मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस.**

( तासिका-१५, श्रेयांकन-१)

२) द्वितीय वर्ष कला शाखा,**मराठी अभ्यासपत्रिका क्र.२साठी चतुर्थ सत्रात ललितलेख** हा साहित्यप्रकार निश्चित करण्यात आला.त्याचे स्वरूप पुढील प्रमाणे-

पेपर कोड- **RJAUMAR401 (तासिका- ४५. श्रेयांकने- ३)**

घटक-१- **ललितलेख या साहित्यप्रकाराचा सैद्धांतिक परिचय**

(तासिका-१५, श्रेयांकन-१)

घटक-२- **परिपूर्ती - इरावती कर्वे,देशमुख आणि कंपनी**

( तासिका-१५, श्रेयांकन-१)

घटक-३- **डोह- श्रीनिवास विनायक कुलकर्णी ,मौज प्रकाशन.**

( तासिका-१५, श्रेयांकन-१)

३) द्वितीय वर्ष कला शाखा,**मराठी अभ्यासपत्रिका क्र.३साठी तृतीय सत्रात** काही भाग बदलण्याचे निश्चित करण्यात आले.त्याचे स्वरूप पुढील प्रमाणे-

पेपर कोड- **RJAUMAR302 (तासिका- ४५. श्रेयांकने- ३)**

घटक-१- (तासिका-१५, श्रेयांकन-१)हा घटक कायम ठेवण्यात आला आहे.

घटक-२- ( तासिका-१५, श्रेयांकन-१) हा घटक कायम ठेवण्यात आला आहे.

घटक-३- ( तासिका-१५, श्रेयांकन-१)

(अ)वृत्तपत्रीय पत्रलेखन (आ)मुद्रितशोधन याऐवजी पुढील घटक निश्चित करण्यात आले-

**(अ) पारिभाषिक शब्द**

**(आ) इतिवृत्त लेखन**

४) द्वितीय वर्ष कला शाखा,**मराठी अभ्यासपत्रिका क्र.३साठी चतुर्थ सत्रात** काही भाग बदलण्याचे निश्चित करण्यात आले.त्याचे स्वरूप पुढील प्रमाणे-

पेपर कोड- **RJAUMAR402 (तासिका- ४५. श्रेयांकने- ३)**

घटक-१- (तासिका-१५, श्रेयांकन-१)हा घटक कायम ठेवण्यात आला आहे.

घटक-२- ( तासिका-१५, श्रेयांकन-१)

(अ) आकाशवाणी आणि दूरदर्शन यासाठी जाहिरातलेखन.

(आ) पारिभाषिक शब्द यांऐवजी

**(अ) मुद्रित माध्यमांसाठी(वर्तमानपत्रे व नियतकालिके) जाहिरातलेखन**

**(आ) आकाशवाणीसाठी जाहिरातलेखन**

**(इ) दूरदर्शनसाठी जाहिरातलेखन.**

घटक-३- ( तासिका-१५, श्रेयांकन-१) हा घटक कायम ठेवण्यात आला आहे.

**३.** पुढील शैक्षणिक वर्षात (२०२२-२३) द्वितीय वर्ष मराठीच्या- **Discipline Specific Electives - विद्याशाखाविशिष्ट वैकल्पिक अभ्यासक्रमासंदर्भात** २ अभ्यासक्रमांची निश्चिती करण्यात आली.

अ) **मराठी साहित्य आणि मराठी भाषेतील संवाद अभ्यास आणि मानवी मूल्ये**

Course Code: **RJMARC03 तासिका - ३०, श्रेयांकने -२**

घटक-१.संवाद- अर्थ आणि स्वरूप

घटक-२.भौतिक जग आणि मनुष्यप्राणी यांतील संवाद.

घटक-३.गोंधळ ते समाधान- वेगळ्या संवादाची गरज.

घटक-४.मानवी नातेसंबंधांची वीण- वैविध्य आणि संवाद

घटक-५.सर्वसमावेषकतेसाठी संवाद-सेतू

घटक-६.संवाद आणि उन्नती

अभ्यासमंडळाच्या विषयतज्ज्ञ (को-ऑप्ट) सदस्य ,मुंबई विद्यापीठाच्या तत्वज्ञान विभागाच्या प्रा.डॉ. प्रिया वैद्य यांनी या अभ्यासक्रमाची रचना व स्वरूप यांची सविस्तर मांडणी केली. तज्ज्ञ ,विशेष निमंत्रित ,डॉ.भारती निरगुडकर व अन्य सदस्यांनी या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे वेगळे स्वरीप अधोरेखित करत या अभ्यासक्रमाला संमती दिली.

आ) **नाट्यपरीक्षण लेखन-**

Course Code: **RJMARC04 तासिका - ३०, श्रेयांकने -२**

घटक-१.नाटक- संकल्पना व वैशिष्ट्ये- नाटकाची संहिता व प्रयोग यांचे घटक.

घटक-२.संहिता परीक्षण

घटक-३.प्रयोग परीक्षण प्रात्यक्षिकासह.

डॉ.भारती निरगुडकर यांनी संहितापरीक्षणाचे तास कमी करून प्रयोगपरीक्षणासाठी १५ तासिका द्याव्यात,असे सुचविले.

डॉ. प्रिया जामकर यांनी या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शनासाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

**४.** अभ्यासमंडळाच्या अध्यक्षा, डॉ. स्नेहा देऊस्कर यांनी महाराष्ट्रशासन , उच्च शिक्षण संचालनालय, शासनपत्र क्र.संकीर्ण -२०२१/प्र.क्र.११०/विशि-५. दि. २६ नोव्हेंबर, २०२१ नुसार **मराठी भाषा धोरणातील उच्च शिक्षणाबाबतीतील मुद्द्यांची अंमलबजावणी** या पत्रकासंदर्भात

महाविद्यालयातील **अमराठी भाषकांसाठी मराठी भाषा प्रमाणपत्र अभ्यासक्रम** तयार करण्यासंदर्भात प्रस्ताव मांडला. हा अभ्यासक्रम तयार करण्यास डॉ.भारती निरगुडकर यांनी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

अभ्यासमंडळाच्या अध्यक्षा, डॉ. स्नेहा देऊस्कर यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि बैठक समाप्त झाल्याचे जाहीर केले.

डॉ. स्नेहा देऊस्कर

मराठी विभागप्रमुख व उपप्राचार्या.